07 OCT 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. शिर्के, डॉ. पाटील यांच्यामुळे विद्यापीठाचा लौकिक

## डॉ. माणिकराव साळुंखे; कार्यकाळ समाप्तीनिमित्त विद्यापीठ प्रशासनातर्फे सत्कार

कोल्हापूर, ता. ६ : 'उत्तम शिक्षक, संशोधक आणि समाजाभिमुख प्रशासक असणारे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि जागतिक दर्जाचे शास्त्रज्ञ प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी उत्तम प्रशासकीय समन्वयवृत्ती, समंजसपणा, कौशल्याचे दर्शन घडविले. त्यांनी शिवाजी विद्यापीठाला शैक्षणिक व संशोधकीय दिशा देऊन जागतिक लौकिक प्राप्त करून दिला', असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी सोमवारी येथे केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा कार्यकाळ समाप्तीनिमित्त सपत्नीक सत्कार करताना माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे. यावेळी शेजारी डॉ. अजितसिंह जाधव, मावळते प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, सुहासिनी पाटील उपस्थित होते.

विद्यापीठ प्रशासनातर्फे कार्यकाळ समाप्तीनिमित्त आयोजित कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या निरोप समारंभात ते बोलत होते. त्यांच्या हस्ते कुलगुरू, प्र-कुलगुरूंना शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा प्रदान करून सपत्नीक सत्कार करण्यात आला. सुमारे पाच तास चाललेल्या समारंभाला विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांसह समाजातील मान्यवर उपस्थित होते.

'माझ्या कारकिर्दीत केलेल्या कामांचे श्रेय माझे एकट्याचे नाही. हे सामूहिक कार्याचे फलित आहे. त्या कामाचा लेखाजोखा आता समाजाने करावयाचा असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. 'आम्ही सर्वसमावेशकतेचे भान ठेवून काम केल्याने आणि विद्यार्थीहिताला सर्वोच्च प्राधान्य दिल्याने विद्यापीठाला विविध क्षेत्रांत अग्रेसर बनवू शकलो, माझ्या पत्नीने दिलेल्या पाठबळामुळेच हा 'पी. एस. पाटील' घडू शकला', अशा शब्दांत त्यांच्याप्रती कृतज्ञता प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. बी. एम. हिर्डेकर, भारती पाटील, नंदकुमार मोरे, माधुरी वाळवेकर, महेश साळुंखे, पी. एस. कांबळे, मधुकर पाटील, संतोष सुतार, एस. जे. नाईक, कृष्णा पाटील, निशा मुडे, संजय कुबल, उदय पाटील, मानसिंगराव निंबाळकर, सुहासिनी पाटील, अवनीश पाटील, प्रकाश कुंभार, श्रीकृष्ण महाजन, रघुनाथ ढमकले यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुनीता शिर्के, मोना पाटील, बी. एस. पाटील, सुरेंद्र जैन आदी प्रमुख उपस्थित होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी स्वागत केले. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी आभार मानले.

**डॉ. साळुंखे यांचा मी पठ्ठ्या...**

'माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्यामुळे कुलसचिव म्हणून सर्वप्रथम प्रशासनाच्या मुख्य प्रवाहात आलो. त्यानंतर पुढील विविध जबाबदाऱ्या पार पाडत असताना त्यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून काम केले. त्या अर्थाने मी डॉ. साळुंखे यांचा पठ्ठ्या आहे, असे सांगताना मला अभिमान वाटतो', असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

**विद्यापीठाची स्वायत्तता जपण्याचे आव्हान**

राजकीय हस्तक्षेप होऊ न देता विद्यापीठाची स्वायत्तता टिकविण्याचे मोठे आव्हान कुलगुरूंसमोर असते. ही बाजूही डॉ. शिर्के यांनी कौशल्यपूर्णतेने सांभाळली. ही स्वायत्तता टिकविण्याचे आव्हान यापुढील कुलगुरूंसमोर असल्याचे डॉ. साळुंखे यांनी सांगितले.

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरु, प्र-कुलगुरुंमुळे शिवाजी विद्यापीठ जागतिक स्तरावर

- डॉ. माणिकराव साळुंखे
- कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांना सहृदय निरोप
- निरोपाने गहिवरले सभागृह

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी आपल्या कार्यकाळात उत्तम प्रशासकीय कौशल्याने शिवाजी विद्यापीठाला शैक्षणिक व संशोधकीय दिशा देऊन जागतिक स्तरावर नाव लौकिक मिळवून दिला आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील पाच वर्षांचा कार्यकाळ सोमवारी पूर्ण झाला. शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित गौरव सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांसह समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली होती. डॉ. साळुंखे यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील सपत्नीक गौरव करून निरोप देण्यात आला.

डॉ. साळुंखे म्हणाले, उत्तम शिक्षक, संशोधक आणि समाजाभिमुख प्रशासक यांचा वस्तुपाठ म्हणजे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची कारकीर्द आहे. जागतिक दर्जाचे शास्त्रज्ञ असलेल्या प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची लाभलेली साथ मौल्यवान आहे. यातूनच शिवाजी विद्यापीठाने अनेक शिखरे सर केली आहेत. डॉ. शिर्के आणि डॉ. पाटील यांनी काम करताना समन्वय वृत्ती व समंजसपणाचे दर्शन घडविले आहे. विद्यापीठाप्रती असलेल्या सर्वोच्च निष्ठेमुळेच आपल्या कार्यकाळात त्यांनी उत्कृष्ट सेवा प्रदान केली आहे. डॉ. शिर्के यांनी विद्यापीठात वादविवाद टाळून संवादावर भर देत सौहार्दपूर्ण वातावरण निर्मिती करण्यावर भर दिला. त्यांच्या प्रशासकीय कामकाजातील यशामध्ये संख्याशास्त्राचा वाटा मोठा आहे.

डॉ. पाटील यांनी देशातल्या एका कोपऱ्यातील विद्यापीठामधून जागतिक दर्जाचे संशोधन होऊ शकते, हे आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले. तथापि, आजही आपल्या देशाचा संशोधन व विकासावरील गुंतवणुकीचा वाटा अत्यल्प आहे. देशाला महासत्ता बनविण्यासाठी शिक्षण, आरोग्य आणि संशोधन व विकास यांवरील गुंतवणुकीत मोठी वाढ करण्याची आवश्यकता आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचा सपत्नीक सत्कार करताना माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे सोबत अजितसिंह जाधव, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. विलास शिंदे व डॉ. सुहासिनी पाटील.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, वसतिगृह अधीक्षक म्हणून काम पाहिले असले तरी तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्यामुळे कुलसचिव म्हणून सर्वप्रथम प्रशासनाच्या मुख्य प्रवाहात आलो. सर्व जबाबदाऱ्या पार पाडत असताना डॉ. साळुंखे यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून काम केले. त्यांच्या चांगल्या बाबींचे अनुकरण केले. हे सामूहिक कार्याचे फलित आहे.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील म्हणाले, गेल्या ४० वर्षांपासून माझी डॉ. शिर्के यांच्याशी मैत्री आहे. त्यांच्यासमवेत प्र-कुलगुरू म्हणून काम करीत असताना विद्यापीठाच्या विकासात योगदान देण्यासाठी ही मैत्री उपयुक्त ठरली. सर्वसमावेशकतेचे भान ठेवून काम केल्याने आणि विद्यार्थीहिताला सर्वोच्च प्राधान्य दिल्यामुळेच शिवाजी विद्यापीठाला विविध क्षेत्रांत अग्रेसर बनू शकलो.

माजी परीक्षा नियंत्रक डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. माधुरी वाळवेकर, महेश साळुंखे, धैर्यशील यादव, डॉ. पी. एस. कांबळे, प्रा. मधुकर पाटील, डॉ. संतोष सुतार, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. कृष्णा पाटील, डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. संजय कुबल, डॉ. उदय पाटील, डॉ. मानसिंगराज निंबाळकर, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. श्रीकृष्ण महाजन आणि डॉ. रघुनाथ ढमकले यांनी मनोगत व्यक्त केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. नंदिनी पाटील आणि धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुनिता शिर्के, डॉ. मीना पाटील, बी.एस. पाटील, सुरेंद्र जैन आदी उपस्थित होते.

07 OCT 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठांची स्वायत्तता टिकवणे कुलगुरूंपुढील आव्हान

## माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे ; कुलगुरू, प्र-कुलगुरू निरोप समारंभ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

राज्यातील अनेक विद्यापीठांमध्ये मोठ्या प्रमाणात राजकीय हस्तक्षेप वाढला आहे. त्यामुळे प्रशासकीय प्रमुखांसह अधिकाऱ्यांना काम करणे अवघड झाले आहे. अशा परिस्थितीत विद्यापीठांची स्वायत्तता टिकवून ठेवणे कुलगुरूंपुढील आव्हान बनले आहे. देशाला महासत्ता बनविण्यासाठी शिक्षण, आरोग्य आणि संशोधन व विकास यावरील गुंतवणुकीत मोठी वाढ करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या पदाचा कार्यकाळ पूर्तीनिमित्त सपत्नीक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. डॉ. साळुंखे म्हणाले, जोपर्यंत विचारांची देवाण-घेवाण होणार नाही तोपर्यंत ज्ञाननिर्मिती असाध्य आहे. कुलगुरू व प्र-कुलगुरू यांनी सर्व घटकांसमवेत संवाद साधून विद्यापीठाला आवश्यक वातावरण तयार केले. त्यामुळे विद्यापीठाची पाच वर्षांत प्रगती साध्य झाली आहे.

सत्काराला उत्तर देताना कुलगुरू डॉ. शिर्के यांनी विद्यार्थी ते कुलगुरू प्रवास उलगडला. ते म्हणाले, प्रशासनासह प्राध्यापक म्हणून सर्व जबाबदाऱ्या पार पाडत असताना डॉ. माणिकराव साळुंखे यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून काम केले. त्यांच्या चांगल्या बाबींचे अनुकरण केले. विद्यापीठ गीत, क्रांतिवन विकास, राजर्षी शाहूंच्या १५० जयंतीनिमित्त कुस्ती संकुल, शाहू महाराज हे बालकुमारांसाठी निर्मिलेले पुस्तक व लोकस्मृती वसतिगृह उभारणी तसेच अभिवादन स्वातंत्र्य सैनिकांना या गोष्टी कुलगुरू म्हणून करू शकलो याचे समाधान आहे, असे ते म्हणाले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील विद्यार्थी ते प्र-कुलगुरूपदाचा ४१ वर्षांचा प्रवास सांगताना भावुक झाले. ते म्हणाले, आता सेकंड इनिंगला सुरुवात झाली आहे. या प्रवासात सर्व कुलगुरू, अधिकारी, प्राध्यापक यांची मदत लाभली. पन्हाळा स्पेस सेंटर, नॅनोसायन्स अधिविभाग उभारणी महत्त्वाचे क्षण राहिले. विद्यार्थीहित डोळ्यांसमोर ठेवून काम केल्याने अवघड काम सोपे होत गेल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

याप्रसंगी वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील, डॉ. बी. एम. हिर्डेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, पैलवान यादव, डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. आर. डी.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा कार्यकाळ समाप्तीनिमित्त सपत्नीक सत्कार करताना माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. व्ही. एन. शिंदे व डॉ. सुहासिनी पाटील. (छाया : पप्पू अत्तार)

ढमकले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, संजय कुबल, प्रा. मधुकर पाटील यांनी मनोगत तर कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. सुनीता शिर्के, डॉ. मीना पाटील, माजी वित्त व लेखाधिकारी बी. एस. पाटील, कोल्हापूर फर्स्टचे सुरेंद्र जैन आदी उपस्थित होते.

### शेवटचा दिस गोड व्हावा, याचसाठी केला अट्टहास...

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी निरोप समारंभाच्या भाषणात विद्यार्थी दशेपासून ते कुलगुरूपदापर्यंतची कारकीर्द कशी घडली, याचा लेखाजोखा मांडला. विविध टप्प्यांवर सहकार्य व मार्गदर्शन करणाऱ्या कुलगुरूंपासून ते अधिकारी, क्लार्क, शिपाई आणि विद्यार्थी या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. शेवटचा दिस गोड व्हावा, यासाठीच केला होता अट्टहास या काव्यपंक्तीने त्यांनी भाषण संपवले. पाच तास चाललेल्या कार्यक्रमातील त्यांचे भाषण लक्षवेधी ठरले.


0 7 OCT 2025

तरुण भारत


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कारकिर्दीची सांगता महामानवांप्रती कृतज्ञतेने


## शिवाजी विद्यापीठ कुलगुरू, प्र-कुलगुरूंकडून महामावांना अभिवादन



छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील.



कोल्हापूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर व जोतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील.



शाहू समाधीस्थळाला भेट देवून अभिवादन करताना कुलगुरू शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील.

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या कारकीर्दीची सोमवारी सांगता झाली.कार्यकाळाच्या अखेरच्या दिवशी सांगता महामानवांप्रती कृतज्ञता व्यक्त करत केली.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या पदाचा पाच वर्षांचा कालावधी आज पूर्ण होत आहे. त्यांच्या बरोबर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचाही अवधी समाप्त होत आहे.

सोमवारी सकाळी कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी बिंदू चौकातील हुतात्मा स्मारकासह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवरायांचा पुतळा, कसबा बावडा येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ, राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाधीस्थळ व दसरा चौक येथील छत्रपती शाहू महाराज यांच्या पुतळ्यासही पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्यालाही अभिवादन केले.

दुपारी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा, कर्मवीर भाऊराव पाटील, विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार आणि शिक्षणमहर्षी डॉ. बापुजी साळुंखे यांच्या पुतळ्यांनाही पुष्प वाहून त्यांनी अभिवादन केले. यावेळी त्यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर होते.मंगळवारी अनेक मान्यवरांनी कुलगुरू डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांची भेट घेऊन सदिच्छा व्यक्त केल्या. यामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, प्रा. गौतमीपुत्र कांबळे, ज्येष्ठ पत्रकार मधु कांबळे, ज्येष्ठ व्यावसायिक बाळ पाटणकर व विविध मान्यवर, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांचा समावेश होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2025
लोकमत

# महामानवांप्रती कृतज्ञतेने कुलगुरू, प्र-कुलगुरूंनी केली कारकिर्दीची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सोमवारी आपल्या कार्यकाळाच्या अखेरच्या दिवसाची सांगता महामानवांप्रती कृतज्ञता व्यक्त करून केली.

कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या पदाचा पाच वर्षांचा कालावधी सोमवारी पूर्ण झाला. त्यांच्याबरोबर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांचाही अवधी समाप्त होत आहे. अखेरच्या दिवशी महामानवांना अभिवादन करून या दोघांनीही कृतज्ञता व्यक्त केली. डॉ. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी बिंदू चौकातील हुतात्मा स्मारकासह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतिराव फुले यांच्या पुतळ्यांना पुष्प वाहून अभिवादन केले. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकातील पुतळ्यालाही अभिवादन केले. कसबा बावडा येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ, समाधिस्थळ आणि दसरा चौक येथील छत्रपती शाहू महाराज यांचा पुतळा येथेही भेट देऊन शाहू महाराजांना अभिवादन केले. तेथून छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्यालाही पुष्प वाहून अभिवादन केले.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांनी सोमवारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाधिस्थळी अभिवादन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2025
पुढारी

# महामानवांप्रती कृतज्ञतेने कुलगुरू, प्र-कुलगुरूंनी केली कारकिर्दीची सांगता

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी सोमवारी कार्यकाळाच्या अखेरच्या दिवसाची सांगता महामानवांप्रती कृतज्ञता व्यक्त करून केली.

कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांचा कार्यकाल समाप्त झाला आहे. अखेरच्या दिवशी ज्यांच्यामुळे आपण पदापर्यंत पोहोचू शकलो, त्या महामानवांना अभिवादन करून या दोघांनी कृतज्ञता व्यक्त केली. सोमवारी सकाळी कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी बिंदू चौकातील हुतात्मा स्मारकासह भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्यांना पुष्प वाहून अभिवादन केले.

त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपतींच्या पुतळ्यालाही पुष्प वाहून त्यांनी अभिवादन केले. कसबा बावडा येथील राजर्षी छत्रपती शाहू महाराज जन्मस्थळ, राजर्षी छत्रपती शाहू महाराज समाधिस्थळ आणि दसरा चौक येथील छत्रपती शाहू महाराज यांचा पुतळा येथेही भेट देऊन शाहू महाराजांना अभिवादन करून कृतज्ञता व्यक्त केली. तेथून कावळा नाका येथील छत्रपती महाराणी ताराराणी यांच्या पुतळ्यालाही पुष्प वाहून अभिवादन केले.

विद्यापीठाच्या प्रांगणात प्रविष्ट झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा, कर्मवीर भाऊराव पाटील, कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार व शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यांनाही पुष्प वाहून त्यांनी अभिवादन केले. यावेळी त्यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आणि जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर होते.

0 7 OCT 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मानवतेच्या जाणिवा सजग राखणे विद्यापीठांची जबाबदारी

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के; विद्यापीठात 'ज्ञानेश्वरी'सह चार ग्रंथांचे प्रकाशन

कोल्हापूर : प्रतिनिधी

साहित्याच्या माध्यमातून समाजामध्ये मानवतेच्या जाणिवा सजग राखणे ही विद्यापीठांची जबाबदारी आहे. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ कर्तव्यभावनेतून कार्यरत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. विद्यापीठात संत तुकाराम अध्यासन आणि विदेशी भाषा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रंथ प्रकाशन सोहळ्यामध्ये ते बोलत होते.

संत तुकाराम अध्यासनातर्फे निरुपणकार मारुतीराव जाधव-तळाशीकर गुरुजी यांची 'तुकयाबंधु कान्होबा महाराज अभंगगाथा' आणि प्रा. पां. ना. कुलकर्णी संपादित 'ज्ञानेश्वरी'ची दुसरी आवृत्ती, तसेच डॉ. मेघा पानसरे संपादित 'स्मृतिस्तंभ' आणि 'दि डायनॅमिक्स ऑफ साऊथ एशिया' या चार ग्रंथांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.



निरुपणकार मारुतीराव जाधव-तळाशीकर यांची 'तुकयाबंधू कान्होबा महाराज अभंगगाथा' प्रकाशित करताना कुलगुरू डॉ. शिर्के आदी.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विज्ञान हे खरे तर वरदान ठरायला हवे; मात्र मानव स्वार्थापायी त्याचा विपरीत वापर करत आहे. विज्ञानाचा हा शाश्वताकडून अशाश्वताकडील प्रवास चिंताजनक आहे. अशावेळी संत साहित्य हे वरदायी आशेचा किरण म्हणून सामोरे येते. साहित्य, इतिहास यांविषयीची पुस्तके प्रकाशित करून त्या माध्यमातून विद्यापीठांनी सामाजिक जाणिवांना आवाहन करत राहणे आवश्यक आहे. या जाणिवांमधूनच विद्यापीठाला पां. ना. कुलकर्णी, तळाशीकर गुरुजींसारखे लोक भेटले. वीस-वीस वर्षे अथक, अविश्रांत परिश्रम घेऊन ते अशा ग्रंथांच्या संपादनाचे कार्य करतात. त्यांच्या या साधनेला विद्यापीठाने कर्तव्यभावनेतून समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम केले.

प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. दिलीप कुलकर्णी, अरुण जाधव यांनी मते मांडली. संत तुकाराम अध्यासनाचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मेघा पानसरे यांनी त्यांच्या संपादित पुस्तकाविषयी उपस्थितांना अवगत केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, डॉ. अवनिश पाटील आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2025
तरुण भारत

# 'मेनन'तर्फे विद्यापीठासाठी ५० लाखांचा निधी



कोल्हापूर :आयडिया लॅबसाठी ५० लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना मेनन समुहाचे चेअरमन सचिन मेनन सोबत प्र–कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मेनन समुहाचे वरिष्ठ अधिकारी.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (एआयसीटीई), 'आयडिया लॅब' (आयडिया डेव्हलपमेंट, इव्हॅल्युएशन अँड एप्लीकेशन लॅब) उभारण्यासाठी मेनन समुहातर्फे सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) अंतर्गत ५० लाख रुपये निधी देण्यात आला. निधीचा धनादेश मेनन समुहाचे चेअरमन, व्यवस्थापकीय संचालक सचिन मेनन यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपुर्द केला.

यावेळी सचिन मेनन म्हणाले की, शिवाजी वियापीठ हे असे ठिकाण आहे, जिथे तरुण मने घडवली जातात. उद्योग जगतातील लोक म्हणून आम्ही व्यवसायासाठी योग्य परिसंस्था तयार करू शकतो.

कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के म्हणाले, मेनन समूह आपल्या कार्यक्षेत्रात कायमच अग्रेसर राहिला आहे. लॅबच्या ॲडव्हायझरी कौन्सिलच्या माध्यमातून अत्याधुनिक सुविधा निर्माण करता येतील, असा विश्वास व्यक्त केला.

स्कूल ऑफ इजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजीचे संचालक डॉ. अजित कोळेकर यांनी प्रास्ताविक केले. आयडिया लॅब समन्वयक डॉ. पी. डी. पाटील यांनी आयडिया लॅबची उद्दिष्टे, प्रस्तावित सुविधा तसेच ध्येयधोरणे यांची माहिती दिली. लॅबचे सह–समन्वयक डॉ. एस. बी. चव्हाण यांनी आभार मानले.

यावेळी प्र– कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेसचे संचालक डॉ. एस. डी. डेळेकर, क्वालिटी ऑफिसर सुभाष माने, इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिलचे हर्षवर्धन पंडित, मेनन समुहाचे कार्यकारी संचालक शरण्या मेनन, देविका मेनन, निवेदिता मेनन, समुहाचे प्रेसिडेंट आर. डी. दीक्षित, व्हाईस प्रेसिडेंट अमित देशपांडे व मिलींद धोपेश्वरकर, प्रमोद सूर्यवंशी, अनिल पुरोहित, योगेश देशमुख आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2025
तरुण भारत

# संख्याशास्त्र अधिविभागाच्या सभागृहाची स्वप्नपूर्ती

■ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभाग सभागृहाचे कोनशिला अनावरणाने उद्घाटन करताना विभागाचे विद्यार्थी. सोबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि मान्यवर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

संख्याशास्त्र अधिविभागासाठी अत्याधुनिक आणि प्रशस्त अशा सभागृहची उभारणी झाली आहे. विभागाच्या सभागृहाच्या उद्घाटनाचे स्वप्नपुर्ती झाल्याचे समाधान वाटत आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या भव्य व आधुनिक सुविधांनी सुसज्ज सभागृहाचे उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, संख्याशास्त्र विषयाचे महत्व सर्वच क्षेत्रांत वाढले आहे. आजचे युग डेटाचे असुन डेटा विश्लेषणाला महत्व आहे. त्यामुळे या विषयासाठी विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे. विद्यार्थ्यांच्या एकत्रित व्याख्यानांसाठी एका मोठ्या सभागृहाची आवश्यकता होती. अधिविभागाच्या माजी अधिविभाग प्रमुख आणि शिक्षकांनी त्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. यातून अत्याधुनिक सभागृहाची निर्मितीने होत असल्याचे सांगितले. प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी या सभागृहामुळे विद्यापीठाच्या वैभवात एक नितांतसुंदर भर पडणार असल्याचे सांगितले.

सभागृहाचे विविध प्रकारचे काम करणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधी, ठेकेदार, अभियांत्रिकी व संगणक विभाग यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. सोमनाथ पवार यांनी स्वागत केले. अधिविभाग प्रमुख डॉ. शशीभूषण महाडिक यांनी प्रास्ताविक केले. तत्पूर्वी संख्याशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या हस्ते कोनशिला अनावरण करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. डी.एन. काशीद, डॉ. एच.व्ही. कुलकर्णी, डॉ. संतोष सुतार, डॉ. कृष्णा पाटील, संगणक विभाग संचालक अभिजीत रेडेकर, अभियांत्रिकी उपकुलसचिव रणजीत यादव, डॉ. गिरीष कुलकर्णी, कल्याण देवस्त्रवकर, अमित कांबळे, विजय पोवार, शिवकुमार ध्याडे, रवी सातपुते आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2025
लोकसत्ता

# लोकस्मृती वसतिगृहासाठी आणखी २५ लाखांचा निधी - रामशेठ ठाकूर

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने शैक्षणिक-सामाजिक जाणीवेच्या भावनेतून लोकस्मृती वसतिगृहाच्या पहिल्या टप्प्यातील इमारतीचे काम गतीने पूर्ण केले आहे. पुढील टप्प्यासाठी आणखी २५ लाख रुपयांचा निधी देण्यात येईल, अशी घोषणा रायगडचे माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी शनिवारी केली.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहाच्या इमारतीचे उद्घाटन विद्यापीठाचे माजी विद्यार्थी ठाकूर यांच्या हस्ते आज ऑनलाईन स्वरुपात करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. त्यांनी यापूर्वी लोकस्मृती वसतिगृह योजनेसाठी २५ लाख रुपयांचा निधी प्रदान केला आहे.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के म्हणाले, समाजातील दात्यांच्या माध्यमातून लोकस्मृती वसतिगृह उभारण्याचे ठरविल्यानंतर देणगीदारांचा लाभलेला प्रतिसाद उत्साहवर्धक होता. अशा सहृदयी दात्यांमुळे पुढील टप्पाही मार्गी लागेल.

**भावनांचा कल्लोळ**

लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहाची संकल्पना ही कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांची. त्यासाठी आई शारदा यांच्या नावे त्यांनी देणगी दिली. या कक्षाची पाहणी करताना त्यांनी आईच्या आठवणींना उजाळा दिला. आई विमल यांच्या स्मृत्यर्थ देणगी दिलेल्या डॉ. भारती पाटील यांचा आईविषयी बोलताना कंठ दाटून आला. पत्नी, मुलगा आणि मुलगी यांच्या नावे सर्व जमापुंजी दान केलेल्या भालचंद्र जोशी यांच्या चेहऱ्यावर समाधान झळकत होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2025
सकाळ

# भाषिक द्वेष विकासातील अडसर : डॉ. अर्जुन चव्हाण

कोल्हापूर, ता. ६ : मानवी विकासातील भाषेचे महत्त्व खूप आहे, पण अलीकडे टोकदार झालेल्या भाषिक अस्मिता आणि त्यामागील राजकारण यामुळे मानव म्हणून आपल्या होणाऱ्या भाषिक विकासासाठी भाषिक द्वेष अडसर ठरू लागला असल्याचे मत शिवाजी विद्यापीठाचे माजी हिंदी विभागप्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांनी व्यक्त केले.

ते रयत शिक्षण संस्थेच्या कदमवाडी येथील राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजच्या हिंदी सप्ताहाच्या समारोपप्रसंगी बोलत होते. ते पुढे म्हणाले, 'व्यक्ती म्हणून आपण सर्व भाषा अभ्यासल्या पाहिजेत. आपले बहुभाषिक असणे हे आपल्या बौद्धिकतेचे खूप मोठे लक्षण आहे. एकापेक्षा अधिक भाषा अवगत असल्याने आपले व्यक्तिमत्त्व अधिक संपन्न होण्यास साहाय्यभूत ठरतात. त्यामुळे भाषिक द्वेषापासून अलिप्त राहून आपण आपला विकास साधूयात.' असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रा . डॉ. डी. आर. भोसले यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात हिंदी भाषेतील रोजगाराच्या उपलब्ध असणाऱ्या संधींच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. याप्रसंगी हिंदी विभागाच्या वतीने साहित्य सौरभ ह्या विशेष भित्तीपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमास कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. ए. पी. उबाळे, आयक्युएससीप्रमुख डॉ. यु. एस. शेळके, हिंदी विभागाचे प्रा. ए. एस. पाटील व विद्यार्थी उपस्थित होते. कॅप्टन डॉ. आर. सी. पाटील यांनी प्रास्ताविक, तर स्नेहल आगलावे व तेजस्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले, तर अंकिता सोनवले यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2025
पुढारी

# अभिजात मराठी ग्रंथ प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन

**कोल्हापूर :** अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमध्ये ९ ऑक्टोबरपर्यंत दुर्मिळ ग्रंथांचे प्रदर्शन आयोजित केले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर, माहिती उपसंचालक प्रवीण टाके, जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे आवाहन कोल्हापूर विभागाचे उपसंचालक (माहिती) प्रवीण टाके व जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ यांनी केले आहे.

07 OCT 2025
सकाळ

# नव्या शैक्षणिक धोरणातून आत्मनिर्भर भारत

## डॉ. शैलेंद्र देवळाणकर; राष्ट्रीय उत्पन्नात स्थानिक बाजारपेठेचा वाटा ४२ टक्के

सकाळ संवाद

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ६ : देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात स्थानिक बाजारपेठेचा वाटा ४२ टक्के आहे, हे प्रमाण वाढवायचे असेल तर उत्पादकता वाढवावी लागेल, त्यासाठी कुशल मनुष्यबळ आणि नवउद्योजकांची आवश्यकता आहे, संशोधनातून नवी उत्पादने आणि व्यावसायिक संधी निर्माण झाल्या पाहिजेत. याचा सर्वंकष विचार करून नवशैक्षणिक धोरण बनवले आहे. यातूनच आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट साध्य होईल, असे प्रतिपादन उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले.

सकाळ कार्यालयात आज त्यांनी संवाद साधला. यावेळी डॉ. देवळाणकर यांनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठ, परराष्ट्र धोरण, शैक्षणिक धोरण या संदर्भाने विस्तृत माहिती दिली.

डॉ. देवळाणकर म्हणाले, 'अमेरिकेच्या वर्चस्वशाहीला आता अटकाव होऊ लागला आहे. भारत, चीन, रशिया यांसारखे देश आता आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वहिताची भूमिका मांडत असून त्याला बहुतांशी देशांचा पाठिंबा मिळत आहे. अनेक बाबतींतले अमेरिकेवरील अवलंबित्व कमी होत चालले आहे. त्यामुळेच आता टॅरिफसारख्या मुद्द्यावरून अमेरिका भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न करत आहे; पण सेवा क्षेत्र सोडल्यास वस्तूंच्या बाबतीत आपल्याला याचा फार तोटा होणार नाही, पुढील काही महिन्यांचा काळ कसोटीचा असेल; पण त्यातून आपण सुखरूप बाहेर पडू. कारण आपल्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात स्थानिक बाजारपेठेचा हिस्सा ४२ टक्के आहे. त्यामुळे टॅरिफचा परिणाम अर्थव्यवस्थेवर कमी प्रमाणात होईल. मात्र, यातून भारताला आत्मनिर्भर बनवणे का आवश्यक आहे, ते अधोरेखित होते. स्वदेशी उत्पादने आणि उद्योग उभारावे लागतील. आपल्याला १० ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचा टप्पा गाठायचा असेल तर सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा ८ ते ९ टक्के दर हा कायम ठेवला पाहिजे. त्यासाठी उत्पादन करणाऱ्या उद्योगांत वाढ झाली पाहिजे. त्यातूनच रोजगार वाढून सकल राष्ट्रीय उत्पन्नही वाढणार आहे. यासाठी उद्योगाबरोबरच शैक्षणिक धोरणाचाही पुनर्विचार करणे आवश्यक होते. त्यातून नव शैक्षणिक धोरण पुढे आले.'



डॉ. शैलेंद्र देवळाणकर

### रोजगारक्षम पदवीधर

डॉ. देवळाणकर म्हणाले, 'यापूर्वी शैक्षणिक धोरण १९८८ ला बनवले होते. त्यात शैक्षणिक गुणवत्तेवर भर दिला होता. आपल्याकडे पदवीधरांची संख्या वाढली; पण त्यातून पुरेसे कुशल मनुष्यबळ उपलब्ध झाले नाही. युरोपची जेवढी लोकसंख्या आहे, तेवढे आपल्याकडे पदवीधर आहेत. त्यामुळे आता पदवीधरांना रोजगारक्षम बनवण्यासाठी नव शैक्षणिक धोरणात भर दिला आहे. त्यासाठी 'एईडीपी प्रोग्रॅम' पदवी घेतानाच प्रत्यक्ष कंपन्यांत जाऊन कार्यानुभव घेणे बंधनकारक आहे. त्यातून विद्यार्थ्यांना बाजारपेठेत कशा प्रकारच्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे? याचे आकलन होईल. त्यातून ते स्वतःला कौशल्याधिष्ठित बनवतील.

या कार्यानुभवातून त्यांना व्यवसायाच्या नव्या संधी लक्षात येतील. त्यातून स्टार्टअप वाढतील. आता विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवीच्या मुख्य विषयाबरोबरच अन्य विषयांचाही अभ्यास करता येणार आहे. त्यासाठी एम्प्लाईड कोर्सेस बनवले आहेत. परदेशी शिक्षणाच्या संधीही नव शैक्षणिक धोरणामुळे वाढणार आहेत.'

**डॉ. देवळाणकर म्हणाले**

- स्वदेशीला बळ देणे गरजेचे
- अमेरिकेचे चीनबाबतचे धोरण बदलल्याने भारताला त्रास
- युवकांनी उद्योजक बनण्याचा विचार केला पाहिजे
- नव्या शैक्षणिक धोरणाला बळ द्यावे
- परकीय गुंतवणुकीतून रोजगारात वाढ

### शैक्षणिक गळतीचे प्रमाण चिंताजनक

डॉ. देवळाणकर म्हणाले, 'राज्यात सर्वसाधारणपणे २ कोटी विद्यार्थी शाळेत प्रवेश घेतात. त्यातील २५ लाख दहावीची परीक्षा देतात. तर १५ लाख बारावीची परीक्षा देतात. मग उर्वरित विद्यार्थी कोठे जातात? शिक्षण सोडल्यावर विद्यार्थी काय करतात? हे चित्र चिंताजनक आहे. असे शाळाबाह्य विद्यार्थी गुन्हेगारीकडे वळण्याची शक्यता अधिक असते.'

### चीनचे प्रारूप यशस्वी झाले

जागतिक बाजारपेठेच्या स्वरूपाबद्दल देवळाणकर म्हणाले, 'चीनने आर्थिक प्रगतीसाठी १९८१ ते २०११ या कालावधीत कार्यक्रम राबवला. यात त्यांनी स्थानिक उद्योगांबरोबरच परकीय गुंतवणुकीलाही प्राधान्य दिले. उद्योजकांनीही धोरण स्वीकारले. पायाभूत सुविधांचा विकास केला. त्यांच्यासाठी हा काळ अनुकूल होता. आपण १९९१ पासून यासाठी प्रयत्न सुरू केले. मात्र, जागतिक मंदी, कोरोना, सीमेवरील तणाव अशी अनेक आव्हाने आहेत.

### अमेरिकेचे प्रभुत्व नाकारले

टॅरिफच्या राजकारणाबद्दल डॉ. देवळाणकर म्हणाले, 'अमेरिकेला आपला जनुकीय बदल केलेला कृषिमाल भारतात विकायचा आहे. मात्र, याचे दुष्परिणाम भारताला होणार आहेत. त्यामुळे भारताने त्याला नकार दिला. या रागातून भारताचा अपमान करण्यासाठी आपल्या वस्तूंवरील टॅरिफ वाढवले. मात्र, आपल्या धोरणांमुळे आता अमेरिकेला भूमिका बदलावी लागणार आहे.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2025
तरुण भारत

# परराष्ट्र धोरण सर्वांपर्यंत जावे

## उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर

कोल्हापूर : प्रतिनिधी

परराष्ट्र धोरणाबाबत बहुतांश भारतीय नागरिक अनभिज्ञ आहेत. गाव पातळीपर्यंत हे धोरण पोहोचणे आता काळाची गरज बनले आहे, असे प्रतिपादन उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ, विद्यापीठ विकास मंच, वृत्तपत्र विद्या व जनसंवाद विभाग, विश्व विद्या व जनसंवाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित माध्यम संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. ट्रम्प... टॅरिफ आणि मीडिया हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. देवळाणकर म्हणाले,



अमेरिका दरवर्षी ८५ हजार व्हिजा देते. त्यापैकी ७१ टक्के व्हिजा भारतीयांचे असतात. अमेरिकेची स्वतःची प्रोडक्ट निर्मिती फार कमी आहे. ते भारत, रशिया, चीन, जपान यासह अन्य देशांतून बऱ्याच वस्तूंची आयात करतात. अमेरिकेचे भारतीय उत्पन्न ३० ब्रिलियन डॉलर आहे, तर ३९ ब्रिलियन डॉलर अमेरिका कर्ज घेते. या वस्तू भारतीयांनी खरेदी केल्या नाहीत तर हा पैसा अमेरिकेला जाणार नाही. रशियाकडून तेल घेण्यास भारताला रोखणारा अमेरिका देश रशियाकडून इथेनॉल, ॲल्युमिनियम खरेदी करतो. त्यामुळे आम्हाला अमेरिकेने ज्ञान शिकवू नये. भारत बलशाही देश बनू नये यासाठी अमेरिका अतोनात प्रयत्न करत असल्याचेही ते म्हणाले. यावेळी परमेश्वर हासुरे, नितीन देशपांडे, डॉ. निशा मुडे-पवार, स्वागत परुळेकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2025
पुढारी

# 'शटडाऊन'मुळे अमेरिकेतील अर्थव्यवस्था नाजूक

## डॉ. शैलेंद्र देवळाणकर; 'ट्रम्प, टॅरिफ आणि मीडिया' माध्यम परिषदेला प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्वदेशी उत्पादनांचा वापर आणि स्वावलंबन हेच अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लावलेल्या टॅरिफ धोरणाला प्रभावी उत्तर देण्याचा मार्ग आहे. भविष्यात आणखीही दबाव वाढेल, याला भारतीयांनी सामोरे गेले पाहिजे. ट्रम्प यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे अमेरिकेत 'शटडाऊन' झाले आहे, त्यामुळे तेथील अर्थव्यवस्थेची नाजूक स्थिती माध्यमांनी देशासमोर आणावी, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय घडामोडी तज्ज्ञ व उच्चशिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले.



कोल्हापूर : माध्यम परिषदेत बोलताना डॉ. शैलेंद्र देवळाणकर.

शिवाजी विद्यापीठ, विश्व संवाद केंद्र पुणे, विद्यापीठ विकास मंच, वृत्तपत्र विद्या व जनसंवाद विभाग यांच्यातर्फे आयोजित 'ट्रम्प, टॅरिफ आणि मीडिया' या विषयावर आयोजित माध्यम परिषदेत ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. देवळाणकर म्हणाले, आर्थिक राष्ट्रवाद प्रभावी होत असून, आत्मकेंद्री मानसिकतेत जगातील प्रत्येक देश जगत आहे. आंतरराष्ट्रीय संघटनांचा प्रभाव कमी होत आहे. त्यामुळे पहिल्या ते दुसऱ्या महायुद्धादरम्यानच्या काळातील राष्ट्रवाद जसा प्रबळ झाला होता तशीच स्थिती आता निर्माण झाली आहे. यातून भारताला भविष्याचा इशारा मिळाला आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विकसित भारताकडे वाटचाल सुरू आहे. परंतु, हा आत्मविश्वास जागा करण्याची भूमिका माध्यमांनी जनसामान्यांसमोर सकारात्मक पद्धतीने मांडली पाहिजे.

वक्त्यांचा परिचय व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. स्वागत परुळेकर यांनी करून दिला. नितीन देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. निशा मुडे यांनी आभार मानले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यापीठ विकास मंचचे प्रांत सचिव परमेश्वर हासबे, विश्व संवाद केंद्राचे प्रांत कार्यवाह नितीन देशपांडे, वृत्तपत्र विद्या व जनसंवाद विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा मुडे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील माध्यम परिषदेत सोमवारी बोलताना उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर. यावेळी केजारी परमेश्वर हासबे, नितीन देशपांडे, डॉ. निशा मुडे, स्वागत पळसेकर उपस्थित होते.

# भारताचे टेरिफबाबतचे धोरण माध्यमांनी सकारात्मकपणे मांडावे

## देवळाणकर; 'ट्रम्प, टेरिफ आणि मीडिया' माध्यम परिषद

कोल्हापूर, ता. ६ : 'अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे अमेरिकेत शटडाऊन झाले आहे. त्याने तेथील अर्थव्यवस्था कमकुवत, नाजूक झाली आहे. ते वास्तव आणि भारताचे या टेरिफबाबतचे धोरण सकारात्मकपणे लोकांसमोर माध्यमांनी मांडावे', असे आवाहन उच्च शिक्षण विभागाचे संचालक आणि परराष्ट्र धोरण विश्लेषक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या व जनसंवाद विभाग, विश्व संवाद केंद्र पुणे, विद्यापीठ विकास मंचातर्फे आयोजित 'ट्रम्प, टेरिफ आणि मीडिया' या विषयावरील माध्यम परिषदेत ते बोलत होते. विद्यापीठाच्या मिलांबरी सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. देवळाणकर म्हणाले, 'ट्रम्प यांनी नवीन व्हिसासाठी प्रत्येकी सुमारे एक कोटी रुपये इतके नोंदणी शुल्क कंपन्यांकडून आकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यातून अमेरिकन अर्थव्यवस्था किती कमकुवत झाली आहे ते लक्षात येते. हे वास्तव माध्यमांनी लोकांसमोर मांडावे. त्याबरोबरच आपल्या देशाचे परराष्ट्र धोरण लोकांना समजावून सांगण्यासह त्याचे लोकशाहीकरण करावे. आर्थिक राष्ट्रवाद प्रभावी होत असून, आंतरराष्ट्रीय संघटनांचा प्रभाव कमी होत आहे. त्यामुळे पहिले ते दुसरे महायुद्धादरम्यानच्या काळातील राष्ट्रवाद जसा प्रबळ झाला होता तशीच स्थिती आता निर्माण झाली आहे. त्यातून सावरण्यासाठी भारतीयांनी स्वदेशी उत्पादन वाढविण्यासह स्थानिक वस्तूंची खरेदी करायला पाहिजे.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'जनसामान्यांची भूमिका तयार करण्यात माध्यमांचे मोठे योगदान असते. भविष्यात देशाला दिशा देणारी चांगली भूमिका घेण्याचे आव्हान बदलत्या माध्यमांपुढे आहे. विकसित भारताकडे आपली वाटचाल सुरू आहे; परंतु हा आत्मविश्वास जागा करण्याची भूमिका माध्यमांनी जनसामान्यांसमोर सकारात्मक पद्धतीने मांडली पाहिजे.'

विद्यापीठ विकास मंचचे समन्वयक ॲड. स्वागत पळसेकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. विश्व संवाद केंद्राचे प्रांत कार्यवाह नितीन देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यापीठ विकास मंचचे प्रांत सचिव परमेश्वर हासबे, वृत्तपत्र विद्या व जनसंवाद विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा मुडे, कैलास कार्इंगडे, विवेक मंद्रुपकर, मनोज पंडित, सुशांत दळवी, नंदकुमार दिवटे, अजिंक्य पत्रावळे आदी उपस्थित होते.

### 'एनईपी'ला त्रासदायक समजू नका

■ या परिषदेनंतर डॉ. देवळाणकर यांनी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील संस्था चालक, प्रतिनिधींसमवेत 'एनईपी'बाबत संवाद साधला. त्यात वर्कलोड, मेजर-मायनर विषय, नियुक्ती आदींबाबत सूचना केल्या. 'एनईपी'ला त्रासदायक समजू नका, त्याची अंमलबजावणी करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी मंजिरी मोरे, अर्चना कोलेकर, सिद्धार्थ शिंदे, संजय परमणे, चंद्रकांत पाटील, महेश जोशी, ॲड. पळसेकर, सहसंचालक डॉ. प्रकाश बच्छाव आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 OCT 2025
पुढारी

# शाही दसरा बुद्धिबळ स्पर्धेत श्रीराज, महिमा, वन्शिल अजिंक्य

## आदित्य, अभय, शौर्य उपविजेते; सोहम, स्वरूप व अद्वैत तृतीय क्रमांकावर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शाही दसरा महोत्सवानिमित्त जिल्हा प्रशासन, कोल्हापूर चेस असोसिएशन व क्रीडा अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बुद्धिबळ स्पर्धेत श्रीराज भोसले, महिमा शिर्के, वन्शिल ठक्कर अजिंक्य ठरले. विविध वयोगटांत या स्पर्धा संपन्न झाल्या.

रेंदाळ येथील श्रीराज भोसलेने सात पैकी साडेसहा गुण मिळवून अजिंक्यपद पटकावले. त्याला रोख ७ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात आले. कोल्हापूरचा आदित्य सावळकर उपजेता ठरला, तर सोहम खासबारदारने तृतीय स्थान मिळवले. १६ वर्षांखालील गटात महिमा शिर्केने साडेसहा गुण व ३७ टायब्रेक गुणांसह अजिंक्यपद मिळवले. १० वर्षांखालील गटात कोल्हापूरचा वन्शिल ठक्कर जेता ठरला.

बक्षीस वितरण शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन समिती सदस्य सिद्धार्थ शिंदे, महाराष्ट्र राज्य विक्रीकर निरीक्षक रूपाली आपटेकर-पाटील, सचिन वर्णोर, प्रीती शिर्के व महेश व्यापारी यांच्या उपस्थितीत झाला. इतर विजेते: खुला गट: ऋषीकेश कबनूरकर, प्रज्वल मुधाळे, श्रीधर तावडे, अनिश गांधी, मधुरेश पाटील, प्रणव पाटील, सारंग पाटील, विवान सोनी, तन्मय पवार, शंतनू पाटील, संतोष कांबळे, शंकर सावंत.

प्रशिक्षक भरत चौगुले यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी वरिष्ठ राष्ट्रीय पंच करण परीट, आरती मोदी, रोहित पोळ, उत्कर्ष लोमटे, विजय सलगर, अभिजित चव्हाण, मारुती गडेद व इंद्रजित कर्वे यांनी परिश्रम घेतले.



शाही दसरा महोत्सवानिमित्त जिल्हा प्रशासन, कोल्हापूर चेस असोसिएशन व क्रीडा विभाग, शिवाजी विद्यापीठ आयोजित स्पर्धेतील विजेते खेळाडू. सोबत मान्यवर आदी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 OCT 2025
पुढारी

# शाहू कॉलेजमध्ये 'अविष्कार' संशोधन स्पर्धा उत्साहात

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक दृष्टिकोन विकसित होण्यासाठी आणि नावीन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ तसेच रयत शिक्षण संस्थेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार रयत शिक्षण संस्थेच्या राजर्षी शाहू कॉलेजमध्ये संस्थात्मक पातळीवरील 'अविष्कार संशोधन स्पर्धा' उत्साहात झाली.

या स्पर्धेचे उद्घाटन डॉ. आर. व्ही. भास्कर यांच्या हस्ते झाले. परीक्षक म्हणून डॉ. एन. व्ही. पवार, डॉ. एन. डी. पाटील आणि डॉ. एस. एस. लवेकर यांनी काम पाहिले. या स्पर्धेत महाविद्यालयातील विविध विभागांतील ७८ विद्यार्थ्यांनी सामाजिक, पर्यावरणीय, तांत्रिक आणि शैक्षणिक क्षेत्रांशी निगडित संशोधन प्रकल्प सादर केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारीवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.